प्रश्न पत्रिका क्रमांक
AM - 0632

जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती

कोतवाल पदभरती परीक्षा-2023

संच क्रमांक
D

वेळ :- 1 तास 30 मिनिट

एकूण प्रश्न :- 50

आसन क्रमांक : 05056........

एकूण गुण :- 100

सूचना -

1. सदर प्रश्न पत्रिकेतील 50 प्रश्न अनिवार्य आहेत.
2. प्रत्येक प्रश्नास समान गुण आहेत.
3. या प्रश्न पत्रिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्याय सूचविले असून, त्यांना अ,ब,क आणि ड असे पर्याय दिलेले आहेत. त्या 4 पर्यायांपैकी योग्य पर्यायावर पूर्ण गोल● करुन आपले उत्तर नोंदवावे. याकरिता काळ्या किंवा निळ्या रंगाच्या बॉलपेनचाच वापर करावा. पेंसिल किंवा शाईचे पेन वापरण्यात येऊ नये.
4. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.
5. एका पेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरल्या जाईल व त्यास गुण देण्यात येणार नाही.
6. आपल्या प्रश्नपत्रिकेचा संच क्रमांक A,B,C,D यापैकी जो असेल तो उत्तर पत्रिकेत नमूद असलेल्या ठिकाणी न चुकता पूर्ण गोल ● करावा.

---

www.Naukrivarta.in

प्रश्न 1 अमरावती जिल्ह्यात किती विधानसभा मतदार संघ आहेत?
अ) सहा ब) सात क) आठ ड) नऊ

प्रश्न 2 मेळघाटचा भाग कोणत्या डोंगररांगांनी व्यापलेला आहे?
अ) गाविलगड ब) सापुतारा क) महादेव ड) कांचनगंगा

प्रश्न 3 वर्धा नदी अमरावती जिल्ह्याच्या कोणत्या भागातून वाहते?
अ) उत्तर ब) दक्षिण क) पश्चिम ड) पूर्व

प्रश्न 4 अमरावती जिल्ह्यातील एकमेव मोठा सिंचन प्रकल्प कोणता?
अ) शहानूर ब) चंद्रभागा क) पुर्णा ड) उर्ध्व वर्धा

प्रश्न 5 शहानूर मध्यम प्रकल्प कोणत्या तालुक्यात आहे?
अ) मोर्शी ब) अंजनगाव सुर्जी क) अचलपूर ड) चांदूर बाजार

प्रश्न 6 अमरावती जिल्ह्यातून कोणता ब्रॉडगेज रेल्वे मार्ग जातो?
अ) मुंबई-दिल्ली ब) मुंबई-कोलकता क) मुंबई-अहमदाबाद ड) नागपूर-सुरत

प्रश्न 7 अमरावती जिल्ह्यातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग कोणता?
अ) महामार्ग क्र. 211 ब) महामार्ग क्र.6 क) महामार्ग क्र.9 ड) महामार्ग क्र.44

प्रश्न 8 .... हे संविधान सभेचे सदस्य नव्हते.
अ) महात्मा गांधी ब) डॉ.राजेंद्र प्रसाद क) डॉ.भिमराव आंबेडकर ड) सर एन.माधवराव

प्रश्न 9 संसदेच्या लोकसभा कनिष्ठ सभागृहाच्या सदस्य संख्येची कमाल अनुमत मर्यादा किती आहे?
अ) 255 ब) 475 क) 525 ड) 552

Scanned with OKEN Scanner

प्रश्न 10 मुंबई (तत्कालीन बॉम्बे) उच्च न्यायालय केव्हा सुरु झाले?

अ) 15 ऑगस्ट 1947 ब) 14 ऑगस्ट 1960 क) 14 ऑगस्ट 1862 ड) 26 जानेवारी 1950

प्रश्न 11 दुसऱ्याच्या मनातील विचार जाणणारा.

अ) महर्षी ब) मनमौजी क) मनकवडा ड) मनमोहन

प्रश्न 12 खालील पैकी चार पर्यायातील स्त्रीलिंग कोणते?

अ) नजर ब) नयन क) डोळा ड) नेत्र

प्रश्न 13 मधाचे बोट लावणे

अ) बोटाला मध लावणे ब) मध खायला देणे क) मधाचे औषध देणे ड) खोटी आशा लावणे.

प्रश्न 14 'श्वास' या शब्दाचा विरुध्दार्थी शब्द कोणता?

अ) अविश्वास ब) श्वासोच्छ्वास क) विश्वास ड) उच्छ्वास

प्रश्न 15 'तोंड' या शब्दाचा समानार्थी शब्द ओळखा.

अ) आनन ब) अंबर क) खग ड) कर

प्रश्न 16 'दिवस' या शब्दासाठी मराठी व्याकरणदृष्ट्या शुध्द व योग्य समानार्थी शब्द शोधा.

अ) दिन ब) दीन क) रात्र ड) यापैकी नाही.

प्रश्न 17 'मुलगा' या शब्दासाठी मराठी व्याकरणदृष्ट्या शुध्द व योग्य समानार्थी शब्द शोधा.

अ) सुत ब) सूत क) मुलगी ड) तनया

प्रश्न 18 अमरावती शहराचे नांव रुख्मिणी हरणाशी जोडले जाते, ती रुख्मिणी हरणाची घटना कोठे घडल्याचे भाविक मानतात?

अ) अंबादेवी मंदीर ब) नंदिश्वर मंदीर क) गणेश मंदीर ड) विठ्ठल मंदीर

प्रश्न 19 अमरावती जिल्ह्यातील नगर परिषदांची संख्या किती आहे?

अ) आठ ब) नऊ क) दहा ड) अकरा

प्रश्न 20 अमरावती जिल्हा किती महसुली उपविभागात विभाजित केलेला आहे?

अ) पाच ब) सहा क) सात ड) आठ

प्रश्न 21 भारतातील खालीलपैकी कोणत्या राज्याची सीमा महाराष्ट्राला लागून नाही?

अ) तेलंगाणा ब) आंध्रप्रदेश क) कर्नाटक ड) गोवा

प्रश्न 22 आज बुधवार आहे. 98 दिवसांनंतर येणारा दिवस कोणता?

अ) रविवार ब) सोमवार क) बुधवार ड) शुक्रवार

प्रश्न 23 एका दिवसात किती वेळा घड्याळातील दोन काट्यांमध्ये 90 अंशाचा कोन असतो?

अ) 24 ब) 48 क) 22 ड) 44

प्रश्न 24 जर 'NSCAIR' हा 'RIACSN' असा लिहीला जात असेल, तर 'CREATE' हा कसा लिहीला जाईल?

अ) AETERC ब) ETAERC क) ETAECR ड) TEAERC

प्रश्न 25 CFI, IKM, OPQ, ?

अ) UUU ब) UST क) VUS ड) TUV

प्रश्न 26 'घन' (Cube) ला किती कडा असतात?

अ) 4 ब) 6 क) 8 ड) 12

www.Naukrivarta.in

Scanned with OKEN Scanner

प्रश्न 27 एका 18 मीटर रुंदीच्या वर्तुळाकार धावपट्टीच्या आतील वर्तुळाचा परीघ 880 मीटर असल्यास त्या धावपट्टीच्या बाहेरील वर्तुळाची त्रिज्या किती?

अ) 140 मीटर ब) 150 मीटर क) 160 मीटर ड) 170 मीटर

प्रश्न 28 एका पेटीत 8 लाल 7 निळे व 6 हिरवे चेंडू आहेत. जर त्यामधील कोणताही एक चेंडू उचलला तर तो चेंडू लाल किंवा हिरवा राहणार नाही याची शक्यता किती?

अ) 1/3 ब) 3/4 क) 1/19 ड) 8/21

प्रश्न 29 खालील पैकी कोणत्या देशाने चंद्रावर 'सॉफ्ट लॅन्डींग' (Soft Landing) चे यश प्राप्त केले नाही?

अ) इंग्लंड ब) भारत क) चीन ड) सोविएत युनिअन

प्रश्न 30 कोणत्या देशाची सीमा मणिपूरला लागून आहे?

अ) चीन ब) म्यानमार क) भूतान ड) बांग्लादेश

प्रश्न 31 .... या संताने आपल्या कृतीतून सार्वजनिक स्वच्छतेचे महत्व जनतेला समजाविले.

अ) संत गाडगे बाबा ब) संत तुकाराम क) संत तुकडोजी महाराज ड) संत ज्ञानेश्वर

प्रश्न 32 महाराष्ट्रात राष्ट्रसंत म्हणून कोणास ओळखले जाते?

अ) संत तुकाराम ब) समर्थ रामदास स्वामी क) संत गाडगे महाराज
ड) संत तुकडोजी महाराज

प्रश्न 33 8 (आठ) मार्च हा दिवस कोणत्या नावाने साजरा केल्या जातो?

अ) शिक्षक दिन ब) महिला दिन क) हुतात्मा दिन ड) यापैकी नाही.

प्रश्न 34 राष्ट्रीय मतदार दिवस .... या दिवशी साजरा केला जातो.

अ) 25 जानेवारी ब) 15 ऑगस्ट क) 26 जानेवारी ड) 26 नोव्हेंबर

प्रश्न 35 मोठ्यात मोठी पाच अंकी संख्या व लहानात लहान चार अंकी संख्या यातील फरक किती?

अ) 90,000 ब) 98,999 क) 9,000 ड) 90,001

प्रश्न 36 एक डझन आंबे रुपये 360/- तर चार डझनची पेटी घेऊन समिरने दोन आंबे खाऊन पेटी रमेशला दिली तर रमेशकडे किती रुपयांचे आंबे आहेत?

अ) 1,440 ब) 1,320 क) 1,380 ड) यापैकी नाही.

प्रश्न 37 एका वर्गात 100 विद्यार्थी आहेत. 60 टक्के विद्यार्थी क्रिकेट खेळतात 30 टक्के विद्यार्थी फुटबॉल खेळतात, आणि 10 टक्के विद्यार्थी दोन्ही खेळ खेळतात, तर क्रिकेट किंवा फुटबॉल न खेळणारी विद्यार्थी संख्या किती?

अ) 25 ब) 20 क) 18 ड) 15

प्रश्न 38 'आळशी' या शब्दाचा विरुद्ध शब्द सांगा.

अ) कामसू ब) मंद क) सुस्त ड) चंचल

प्रश्न 39 'प्राचीन' शब्दाचा विरुध्दार्थी शब्द ओळखा.

अ) पुरातन ब) ऐतिहासिक क) पुर्वीचे ड) यापैकी नाही.

प्रश्न 40 शुध्द शब्द ओळखा.

अ) कलपना ब) कल्पना क) कल्पणा ड) कल्पन्ना

www.NaukriVarta.in

Scanned with OKEN Scanner

प्रश्न 41 खालील पैकी चुकीची जोडी ओळखा

अ) राजेवाडी - संत्री ब) वसई - केळी क) सांगली - द्राक्षे ड) अलिबाग - कलिंगड

प्रश्न 42 MTDC म्हणजे खालील पैकी काय?

अ) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ ब) महाराष्ट्र ट्रान्सपोर्ट विकास महामंडळ

क) महाराष्ट्र टेलीफोन विकास महामंडळ ड) महाराष्ट्र ट्रायबल विकास महामंडळ

प्रश्न 43 क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा कोणता आहे?

अ) पुणे ब) अहमदनगर क) सोलापूर ड) नागपूर

प्रश्न 44 कोणत्या जिल्ह्यास 'ज्वारीचे कोठार' म्हणतात?

अ) सोलापूर ब) सातारा क) अहमदनगर ड) बीड

प्रश्न 45 'एलोरा' लेण्यांमध्ये कुठल्या धर्माचे शिल्प पहायला मिळतात?

अ) हिंदू ब) बौद्ध क) जैन ड) यापैकी सर्व

प्रश्न 46 जिल्हा पातळीवर पुर्णपणे ई-ऑफिसचा उपयोग करणारा महाराष्ट्रातील पहिला जिल्हा कोणता आहे?

अ) सिंधुदुर्ग ब) रत्नागिरी क) रायगड ड) ठाणे

प्रश्न 47 भारतरत्न या पुरस्काराने सन्मानित केलेले महाराष्ट्रातील पहिले व्यक्ती कोण?

अ) डॉ.बाबासाहेब आंबेडकर ब) साने गुरुजी क) महर्षि धोंडो केशव कर्वे

ड) वि.दा.सावरकर

प्रश्न 48 महाराष्ट्रातील सर्वाधिक वनक्षेत्र .... जिल्ह्यात आहे.

अ) गडचिरोली ब) सातारा क) चंद्रपूर ड) कोल्हापूर

प्रश्न 49 महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी कोणत्या शहरास म्हणतात?

अ) मुंबई ब) पुणे क) कोल्हापूर ड) नागपूर

प्रश्न 50 महाराष्ट्रात सर्वाधिक मोठा प्रशासकीय विभाग कोणता?

अ) अमरावती विभाग ब) नाशिक विभाग क) औरंगाबाद विभाग ड) पुणे विभाग

www.NaukriVarta.in

Scanned with OKEN Scanner